# निरोगी मन हेच निरोगी आरोग्य-डॉ. राम जावळे

लातूर- निरोगी मन असणे म्हणजेच निरोगी आरोग्य प्राप्त करणे आहे. त्यामुळे निरोगी आरोग्य ही संपत्ती निर्माण करणे व टिकविण्यासाठी मनाला जपणे आवश्यक झाले आहे. भरपुर आनंदी राहा व सतत कार्यक्षम रहा असा सल्ला डॉ. राम जावळे यांनी दिला. मानव उत्कर्ष समता व कॉक्सिट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्यसंपत्ती आणि यश या विषयावर ते बोलत होते.

या कार्यक्रमासाठी डॉ. राम जावळे व गणेश एखंडे हे प्रमुख वक्ते होते. डॉ.जावळे यांनी अत्यंत हसत खेळत आरोग्य कसे जपावे व आनंदी जीवन जगावे याबाबत मार्गदर्शन केले. गणेश एखंडे यांनी आर्थिक व्यवस्थापनातून जीवनातील अडचणी सहज सोडवता येतील अशा उपयुक्त टिप्स दिल्या. निरोगी जीवनासाठी व्यायाम करणे व समृध्दीसाठी आर्थिक बचत करणे अशी गुरूकिल्ली उपस्थितांना दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.बी.एल.गायकवाड होते. कार्यक्रमाला उपप्राचार्य टी.एस.गायकवाड तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा.जे.ए.चव्हाण यांनी केले.